॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०३ वा | बुधवार, दि. १८ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राज्यावर अवकाळीचे सावट
## विदर्भासह मध्य महाराष्ट्रात गारपिटीचा इशारा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात सध्या उन्हाचा चटका वाढलेला असतानाच आता हवामानात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्याच्या अनेक भागांत पावसाची हजेरी लागणार असून, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये गारपिटीचा इशाराही देण्यात आला आहे.

ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार, १७ ते २० मार्च या कालावधीत कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**तापमानाचा पारा चाळीशी पार**

सोमवारी विदर्भातील वाशिममध्ये राज्यातील सर्वाधिक ४०.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर दुसरीकडे पुण्यात रात्रीचा पारा १६.४ अंशांपर्यंत खाली आल्याने थंडावा जाणवला. मात्र, आता ढगाळ हवामानामुळे रात्रीच्या उकाड्यात वाढ होण्याची शक्यता आहे.



**शेतकरी आणि नागरिकांना आवाहन**

राज्यात एकाच वेळी उष्णतेची लाट, अवकाळी पाऊस आणि गारपिटीचे संकट उभे ठाकले आहे. याचा मोठा फटका काढणीला आलेल्या पिकांना आणि फळबागांना बसण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत. तसेच नागरिकांनी बदलत्या हवामानामुळे उद्भवणाऱ्या आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

गारपीटः बुधवारी (१८ मार्च) अमरावती, अकोला, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या सहा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी गारपीट होण्याची दाट शक्यता आहे. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, धाराशिव आणि लातूरसह मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर), सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज आहे. १८ मार्चपासून मुंबईसह कोकणात हलक्या सरी कोसळू शकतात. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

**उकाड्याचा तडाखा कायम**

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या उत्तर कोकण पट्ट्यासह नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या १३ जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्रता कायम राहील. रात्रीच्या वेळी दमट हवामानामुळे उकाडा वाढणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

# अजित पवारांच्या अपघातामागे 'मोठा माणूस'?
## रोहित पवारांचा खळबळजनक दावा

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** विधानसभेच्या अधिवेशनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत चर्चा व्हावी, यासाठी विरोधकांकडून सातत्याने मागणी केली जात असताना अद्यापही या मुद्द्यावर सविस्तर चर्चा होत नसल्याने राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी याबाबत नाराजी व्यक्त करत, हा मुद्दा सभागृहात येण्यास अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप केला आहे.

रोहित पवार यांनी सांगितले की, त्यांनी विधानसभा अध्यक्षांची भेट घेऊन या प्रकरणावर चर्चा घेण्याची मागणी केली आहे. अध्यक्षांनी उद्या किंवा सोमवारी चर्चा घेण्याचे आश्वासन दिले असले, तरी प्रत्यक्षात काय घडते, याकडे लक्ष ठेवावे लागेल, असे त्यांनी म्हटले. या अपघाताबाबत पारदर्शकता आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.




या प्रकरणात 'VSR' कंपनीला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप करत, यामागे "कोणीतरी मोठी व्यक्ती" असल्याचा संशय रोहित पवार यांनी व्यक्त केला. याच मुद्द्यावर इतर नेते, जसे शशिकांत शिंदे आणि अमोल मिटकरी, यांनीही चर्चा व्हावी यासाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.

"आमच्याकडे काही महत्त्वाची माहिती आहे. सरकारने योग्य पावले उचलली नाहीत, तर ती माहिती सार्वजनिक करू," असा इशाराही रोहित पवार यांनी दिला. सत्तेत असतानाही संबंधितांना न्याय मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांचे काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

28 जानेवारी रोजी झालेल्या या विमान अपघातात अजित पवार यांचा मृत्यू झाला होता, ज्यामुळे राज्यभरातून शोक व्यक्त करण्यात आला. मात्र या घटनेनंतर अपघाताची कारणे, तपासाची दिशा आणि संबंधित अहवालांबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळे या प्रकरणावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन सत्य बाहेर येण्याची मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता:औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

# सकल मराठा समाजतर्फे आज मराठा समाजातील नगरसेवकांचा सत्कार
## महापौर निवडीनंतर आंदोलन करणे ही योग्य वेळ नाही : माऊली पवार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सकल मराठा प्रबोधन प्रशिक्षण व संशोधन संस्था सोलापूरच्या वतीने सोलापूर महापालिकेतील यंदाच्या निवडणुकीत विजयी सर्व मराठा समाजातील नगरसेवकांचा गौरव सोहळा बुधवार दि. 18 मार्च 2026 रोजी सायंकाळी 5 वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित केला आहे, अशी माहिती माऊली पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर महापालिकेतील निवडणुकीत मराठा समाजाचे सर्वपक्षीय तेरा नगरसेवक निवडून आले आहेत. स्वीकृत नगरसेवक पदी दोन सदस्य आहेत असे एकूण 15 नगरसेवक महापालिका सभागृहात निवडून आले आहेत. त्याचबरोबर राज्यसभेच्या नूतन खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांचाही सत्कार यावेळी करण्यात येणार आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा होणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन माऊली पवार यांनी केले आहे.



**त्या आंदोलनाला सकल मराठा समाजचे ना समर्थन, ना विरोध**

सोलापूर महानगरपालिकेच्या महापौरपदाबाबत सुरू असलेल्या आंदोलनाला सकल मराठा समाजाचे ना समर्थन आहे ना विरोध, अशी भूमिका सकल मराठा समाजाचे माऊली पवार यांनी मांडली. हे आंदोलन यापूर्वी व्हायला हवे होते. निवड झाल्यानंतर सध्याची वेळ योग्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सोलापूर महानगरपालिकेचे महापौरपद खुल्या गटासाठी राखीव असतानाही मराठा समाजाला संधी देण्यात आली नसल्याचा आरोप करत मराठा क्रांती मोचार्चे राम जाधव यांनी आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या माध्यमातून मराठा समाजाला न्याय मिळावा, अशी त्यांची मागणी आहे. या संदर्भात विचारले असता माऊली पवार पुढे म्हणाले, मराठा समाजाला महापौर पद मिळाले पाहिजे. ही मागणी रास्त आहे पण निवडीनंतर मागणी करणे ही योग्य वेळ नाही. निवडणूक संपली आहे. कुणाला महापौर करावे हा सत्ताधारी पक्षाचा निर्णय आहे. त्यात आम्ही हस्तक्षेप कसे करणार ? गरजवंतांच्या लढ्यात ते राजकीय लोक येत नाहीत. आमचा लढा हा गरजवंतासाठी आहे. महापौर पदासाठीच्या त्या आंदोलनाला आमचा पाठिंबा नाही अथवा समर्थनही नाही. नो कॉमेंट्स, असे उत्तर माऊली पवार यांनी यावेळी दिले.

या पत्रकार परिषदेस प्रा. गणेश देशमुख, दत्ता मुळे, दिनकर जगदाळे आदी उपस्थित होते.

# माऊली पवार यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला असता तर समाजाची ताकद वाढली असती : राम जाधव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजावर झालेल्या कथित राजकीय अन्यायाच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला आता अंतर्गत मतभेदांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्री, तसेच स्थानिक पदाधिकारी कोठे आणि तडवळकर यांच्या विरोधात भूमिका घेतली असताना, माऊली पवार यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, माऊली पवार यांनी आंदोलनाला पाठिंबा देण्याऐवजी पालकमंत्री यांच्या हस्ते १८ मार्च २०२६ रोजी मराठा समाजातील नगरसेवकांचा सत्कार कार्यक्रम आयोजित केला आहे. यामुळे समाजात संभ्रम निर्माण झाला असून आंदोलनाची एकजूट कमकुवत होत असल्याची टीका होत आहे.



मराठा आंदोलक यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'माऊली पवार यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला असता तर समाजाची ताकद वाढली असती. मात्र त्यांनी उलट मराठा समाजाला पालकमंत्र्यांच्या बाजूला उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.'

तसेच १८ मार्च रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीच्या पार्श्वभूमीवर आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. पहिले सव्वा वर्ष कुणबी मराठा समाजातील अध्यक्ष व्हावा, यासाठी आंदोलनकर्त्यांकडून दबाव टाकला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'जर उद्या कुणबी मराठा अध्यक्ष झाला नाही, तर समाज हे पालकमंत्री आणि माऊली पवार यांच्यातील आर्थिक व्यवहाराचे परिणाम असल्याचे समजेल,' असा गंभीर आरोपही यांनी केला.

दरम्यान, या सर्व घडामोडींमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, उद्याच्या अध्यक्ष निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

3000 Sq.ft. प्लॉट N.A. देणे आहे
शिनगारे सिटी सांगोला
वासुद रोड, अल्टिमेट जिम च्या पूर्वेस
संपर्क :
डी. बी. शिंदे
9579421465

# शिक्षण क्षेत्रात खळबळ
## परीक्षेच्या आदल्या दिवशी भूगोलाच्या ५० प्रश्नपत्रिका चोरीला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** परीक्षेआधीच दहावीचा भूगोल पेपर फुटल्याची बातमी समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यातल्या सांगोल्यामध्ये दहावीच्या भूगोल पेपरची चोरी झाली. या पेपर चोरी प्रकरणाची बोडार्ने दखल घेतली. या प्रकरणाच्या तपासासाठी बोडार्चे अधिकारी सांगोल्याला तात्काळ रवाना झाले आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे उपसंचालक स्वतः सांगोल्यातील ज्या शाळेतून भूगोलाच्या पेपरची चोरी झाली होती त्या ठिकाणाला भेट देणार आहेत.

सोलापुरातील सांगोल्यामध्ये असलेल्या सांगोला विद्यामंदिर प्रशालेतून भूगोलाच्या तब्बल ५० प्रश्नपत्रिका चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या पेपर फुटी प्रकरणाची पोलिसांनी



दखल घेत चौकशी सुरू केली आहे. या तपासातून शाळेमधील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

सांगोला विद्या मंदिर विद्यालयाच्या कस्टी रूमचे कुलूप तोडून अज्ञात चोरांनी दहावीच्या भूगोल विषयाच्या ५० प्रश्नपत्रिका चोरून नेल्याची घटना घडली होती. दरम्यान कस्टी रूमच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची बाब आता पोलिस तपासातून समोर आली आहे. या घटनेनंतर खळबळ उडाली आहे. प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

सोलापूर जिल्हा पोलिस उपाधीक्षक प्रीतम कुमार यावलकर यांनी घटनास्थळी येऊन भेट दिली आहे. दरम्यान पुणे बोडार्चे अधिकारी देखील या शाळेला भेट देणार आहेत. भूगोलाची प्रश्नपत्रिका चोरी झाल्यानंतर उद्याच्या भूगोल पेपर विषयी विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पेपर पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, सांगोला विद्यामंदिर येथील दहावीच्या भूगोल विषयाच्या ५० प्रश्नपत्रिकांचा गठ्ठा चोरीला गेल्या प्रकरणी बंदोबस्तासाठी असलेले पोलिस कर्मचारी आणि होमगार्ड दोषी असतील तर त्याच्याविरोधात कारवाई होईल. सोलापूर ग्रामीण अप्पर पोलिस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर यांनी ही माहिती दिली.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

# गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसचे अनोखे आंदोलन
## 'नाल्यातून गॅस' प्रयोगाद्वारे निषेध

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने केंद्र सरकारच्या गॅस सिलेंडर दरवाढीविरोधात मंगळवारी अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर, कुंभार वेस नाल्याजवळ, सोलापूर शहर काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या नेतृत्वाखाली, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'नाल्यातून गॅस काढण्याच्या' संकल्पनेचा संदर्भ घेत, काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष नाल्यातून गॅस तयार करण्याचा अभिनव प्रयोग करून सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविला. या प्रयोगाद्वारे सत्ताधाऱ्यांच्या दाव्यांची खिल्ली उडवत जनतेच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी कार्यकर्त्यांनी नरेंद्र मोदी यांच्या प्रतिमेसमोर हे मोदी बाबा, हे मोदी बाबा, मेरी लाज रख लो आज, नाले से गॅस निकालो आज, चाय पकोडे बनालो आज, अशी आरती केली आणि नाले का गॅस का सपना दिखाना बंद करो, गॅस सिलेंडर सस्ता करो असे म्हणत गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

या आंदोलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सोलापूर शहर काँग्रेस ई-ब्लॉकचे अध्यक्ष उदयशंकर चाकोते यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी बोलताना चेतनभाऊ नरोटे यांनी घणाघाती आरोप करताना म्हणाले की, केंद्रातील मोदी सरकारच्या चुकीच्या व जनविरोधी धोरणांमुळे देशात गॅस



सिलेंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाला असून सततच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णतः कोलमडले आहे. गॅस मिळवण्यासाठी नागरिकांना दिवसेंदिवस रांगेत उभे राहावे लागत आहे, तर दुसरीकडे अनेक लघुउद्योग बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर काँग्रेस पक्षाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नाल्यातून गॅस' या भ्रामक संकल्पनेचा पदार्फाश करण्यासाठी प्रतिकात्मक आंदोलन छेडण्यात आले. आंदोलनादरम्यान नाल्यातून गॅस तयार करण्याचा कथित प्रयोग सादर करण्यात आला. नाल्याजवळ उपकरणांच्या सहाय्याने गॅस निर्मितीचा प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रत्यक्षात गॅस तयार न झाल्याने ही संकल्पना केवळ घोषणांपुरतीच मर्यादित असल्याचे स्पष्ट झाले.

पुढे बोलताना चेतनभाऊ नरोटे यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका करत सांगितले की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांमुळे देशातील गॅस सिलेंडरचा तुटवडा दिवसेंदिवस वाढत आहे. दरवाढीमुळे सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले असून लोकांना रांगेत उभे राहूनही गॅस मिळत नाही. 'नाल्यातून गॅस' काढण्याचे जे 'निंजा टेक्निक' सांगितले जाते, ते प्रत्यक्षात फसवे ठरत आहे. आज आम्ही स्वतः प्रयोग करून पाहिला, मात्र गॅस तयार झाला नाही. यावरून स्पष्ट होते की, सरकार केवळ घोषणाबाजी करून जनतेची दिशाभूल करत आहे. वाचाळवीरासारखे राजकारण करून देशाच्या हितापेक्षा सत्तेचे राजकारणच पुढे नेले जात आहे.' या आंदोलनाद्वारे काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारच्या फसव्या आश्वासनांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी व तुटवडा दूर करावा, अशी जोरदार मागणी केली.

यावेळी ई-ब्लॉकचे अध्यक्ष उदयशंकर चाकोते म्हणाले की, 'गॅस सिलेंडर बुकिंगचे दिवस वाढवून सरकार जनतेची दिशाभूल करत आहे. प्रत्यक्षात बुकिंग केल्यानंतरही नागरिकांना गॅस एजन्सीसमोर तासन्तास, दिवसेंदिवस रांगेत उभे राहावे लागत आहे. एकीकडे सरकार गॅस पुरवठा सुरळीत असल्याचा दावा करते, तर दुसरीकडे सर्वत्र लागलेल्या रांगा सरकारचे अपयश उघड करत आहेत. सणासुदीच्या काळात स्वयंपाकासाठी गॅस उपलब्ध नसल्याने महिला भगिनी, हॉटेल व्यावसायिक आणि लघुउद्योजक प्रचंड अडचणीत आले आहेत. हे सरकार केवळ घोषणा आणि दिखाव्यापुरते मर्यादित असून जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा फसव्या धोरणांविरोधात जागरूक होणे गरजेचे आहे.' अन्यथा देशावर खूप वाईट परिस्थिती येणार आहे.

याआंदोलनात यावेळी शहराध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, माजी महापौर संजय हेमगड्डी, प्रदेश सचिव राहुल वर्धा, ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते, महिला अध्यक्षा प्रमिलाताई तूपलवंडे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपंडला, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, उद्योग व वाणिज्य सेल अध्यक्ष पशुपती माशाळ, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, माजी नगरसेवक दत्तू अण्णा बंदपट्टे, सिद्धराम चाकोते, भारतीताई इप्पलपल्ली, महिला अध्यक्षा हेमाताई चिंचोळकर, सुमनताई जाधव, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, बसवराज म्हेत्रे, अनिल मस्के, अशोक कलशेट्टी, संजय गायकवाड, भीमराव शिंदे, माजी नगरसेविका शोभा बोबे, संध्या काळे, संघमित्रा चौधरी, ज्योती गायकवाड, नूर अहमद नालवार, सुनील सारंगी, धीरज खंडारे, सचिन पवार, अभिषेक गायकवाड, श्रीनिवास परकीपंडला, आप्पाजी गायकवाड, शिवाजी साळुंखे, चंद्रकांत टिक्के, हणमंतु रुपनर, मोहसीन फुलारी, जब्बार शेख, अभिलाष अच्युगटला, श्रीनिवास कोटा आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हा व महिला रुग्णालयांना पुरेसा गॅस पुरवठा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रूग्णालय, जिल्हा रूग्णालय आणि महिला व नवजात शिशु रूग्णालयाला गॅसचा तुटवडा नाही. आरोग्य संस्था या इर्मजन्सीमध्ये येत असल्याने पुरवठा विभागाकडून गॅसचा पुरवठा सुरळीत होत आहे.

अन्य ठिकाणी गॅसचा तुटवडा जाणवत असला, तरी येथील तिन्ही संस्थांना गॅस पुरवठ्यात कोणतीही व्यत्यय नाही.



येथील तीन आरोग्य संस्थेतील आंतररूग्ण विभागात दाखल रूग्णांना नियमितपणे चहा, नाष्टा व दोन वेळचे जेवण दिले जाते. यासाठी मोठ्या प्रमाणावर गॅस लागते. रूग्णालय हे तातडीमध्ये येत असल्याने या संस्थांना पुरवठा विभागाकडून गॅस पुरवला जातो.

दरम्यान, अत्यावश्यक सेवेसाठी गॅस पुरवठा सुरळीत राहणार असल्याचे यापूर्वीच जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे. त्यामुळे आरोग्य सेवा सुरळीत राहणार आहे. रूग्णालयाला शंभरटक्के गॅस पुरवठा करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

## संपादकीय

# न्याय निवडक का? अल्पवयीनांवरील अत्याचार आणि समाजाची दुटप्पी भूमिका

अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार ही केवळ कायद्याची नव्हे तर समाजाच्या संवेदनशीलतेचीही कठोर परीक्षा असते. अशा प्रत्येक घटनेत पीडितेला न्याय मिळणे हेच सर्वात महत्त्वाचे असते. मात्र अलीकडील एका प्रकरणानंतर समाजात पुन्हा एकदा एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. आपला संताप आणि आंदोलन हे खरोखर न्यायासाठी असते का, की ते निवडक प्रसंगांपुरतेच मर्यादित असते? एखाद्या धार्मिक किंवा सामाजिक ओळखीशी संबंधित व्यक्तीवर आरोप झाल्यावर समाजातील प्रतिक्रिया अनेकदा वेगळी दिसते. काही प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर आंदोलन, मोर्चे, घोषणाबाजी आणि सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसतात. परंतु काही अन्य घटनांमध्ये, विशेषतः जेव्हा आरोपी आपल्या 'ओळखीच्या चौकटीत'बसतो, तेव्हा आश्चर्यकारकरीत्या शांतता पसरते.

ही शांतता नेमकी कशामुळे येते?

धर्म, राजकारण, की सामाजिक सोय?

न्याय हा कधीही व्यक्तीच्या धर्मावर, जातिवर किंवा राजकीय ओळखीवर अवलंबून असू शकत नाही. अल्पवयीन मुलीवर अत्याचार हा कोणत्याही परिस्थितीत गंभीर गुन्हा आहे आणि त्यावर कठोर व निष्पक्ष कारवाई होणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांमध्ये पीडितेचा आवाज सर्वात महत्त्वाचा असतो. तो दबला जाऊ नये, झाकला जाऊ नये आणि कोणत्याही कारणाने दुर्लक्षितही होऊ नये.

समाजातील तथाकथित नैतिकतेचे ठेकेदार अनेकदा 'धर्मरक्षण' किंवा 'संस्कृतीरक्षण' याच्या नावाखाली रस्त्यावर उतरतात. मात्र जेव्हा त्याच चौकटीतील एखाद्यावर गंभीर आरोप होतात, तेव्हा त्यांची भूमिका का बदलते? ही दुटप्पी भूमिका केवळ समाजातील विश्वास कमी करत नाही, तर पीडितांना न्याय मिळण्याच्या प्रक्रियेलाही बाधा आणते. न्यायाची लढाई ही कोणत्याही एका धर्माची किंवा विचारसरणीची नसते. ती मानवतेची असते. त्यामुळे प्रत्येक घटनेत एकसमान भूमिका घेणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. अन्यथा 'न्याय' हा शब्दच केवळ घोषणांपुरता मर्यादित राहील.

या पार्श्वभूमीवर काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात.

– अत्याचाराच्या प्रत्येक घटनेत समान तीव्रतेने आवाज उठतो का?

– की समाज आणि राजकारण आपल्याला सोयीस्कर अशाच घटनांवर प्रतिक्रिया देतात?

– पीडितेला न्याय देण्यासाठी आपण खरंच कटिबद्ध आहोत का?

आज गरज आहे ती संतुलित, निष्पक्ष आणि निर्भीड भूमिकेची.

पीडितेला न्याय मिळणे, दोषींना शिक्षा होणे आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर व्यवस्था उभी राहणे. हेच खरे 'समाजरक्षण' आहे. न्याय निवडक नसतो. तो सर्वांसाठी समान असतो आणि तसाच राहिला पाहिजे.

# जागतिकीकरण विरुद्ध राष्ट्रवाद

१९९० च्या दशकात जगभरात जागतिकीकरणाचे वारे सुसाट वाहू लागले. गॅट करारामुळे व्यापार आणि उद्योग क्षेत्रासाठी जगभरातील देशांमधील सीमा काही प्रमाणात खुल्या होऊ लागल्या. जागतिकीकरणाने एकूणच जगाची सर्व अंगांनी व्यवस्था बदलण्यास सुरुवात केली. उदारीकरण केवळ आर्थिक बाबतीतच झाले नाही, तर पुढे जाऊन विचार, संस्कृती, आहार आणि जीवनशैली अशा सर्व अंगांना व्यापणारे ठरले. यामधून अनेक सकारात्मक परिणाम झाले; परंतु त्याचबरोबर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून नववसाहतवाद निर्माण होण्याची भीतीही वाढू लागली. देशी सांस्कृतिक अस्मिता जपण्यासाठी जागतिकीकरणाविरुद्ध सांस्कृतिक राष्ट्रवाद अनेक देशांत निर्माण होऊ लागला. विशेष म्हणजे जागतिकीकरणाची फळे चाखणारेच लोक याविरुद्ध बोटे मोडताना दिसू लागले. ही दुटप्पी भूमिका अनेकांनी स्वीकारल्याचे दिसून येते.

आज अमेरिकेसारखे देश आणि त्यांचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जेव्हा 'अमेरिका फर्स्ट' ही घोषणा देतात, तेव्हा ती घोषणा नव-राष्ट्रवादाची मागणी करणारी आणि जागतिकीकरणाला विरोध करणारी ठरते. त्यांच्या धोरणांमध्ये राष्ट्रवादाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. इतर देशांच्या मालावर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावणे किंवा परदेशी लोकांवर निर्बंध आणणे, या धोरणांमुळे अमेरिकेला पुन्हा राष्ट्रवादी दिशेकडे वळवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांचा प्रवास जागतिकीकरणाकडून राष्ट्रवादाकडे सुरू असल्याचे जाणवते.

खरं तर राष्ट्रवाद ही एक मानसिक आणि भावनात्मक कल्पना आहे. राष्ट्रवाद हा देशभक्ती, देशप्रेम, जातीय, धार्मिक व भौगोलिक घटक, तसेच समान राजकीय महत्त्वाकांक्षा या धारणांमधून विकसित झाला आहे. राष्ट्रवाद प्रत्येकाला आपल्या देशावर प्रेम करण्याची प्रेरणा देतो. आधुनिक सार्वभौम राज्यव्यवस्थेचा आधारही राष्ट्रवादाला मानला जातो.

१९व्या शतकाच्या प्रारंभापासून राष्ट्रवाद ही एक प्रभावी राजकीय शक्ती बनू लागली. १८७१ पर्यंत इटली आणि जर्मनी यांचे एकीकरण झाले. राष्ट्रीयत्वाच्या आधारे राज्यांची निर्मिती होऊ लागली. पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या पॅरिस शांतता करारामध्ये राष्ट्रांच्या स्वनिर्णयाच्या तत्त्वाला मान्यता देण्यात आली. एकजिनसी संस्कृती असलेल्या समाजाला स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा हक्क देण्यात आला.


समान भाषा, समान धर्म, समान संस्कृती आणि समान इतिहास हे घटक लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करतात. राष्ट्रवाद ही एक उदात्त विचारसरणी असून ती व्यक्तीला एक अस्मिता प्रदान करते. देशाचा आर्थिक विकास आणि सांस्कृतिक जतन करण्याची प्रेरणा राष्ट्रवाद देतो. मात्र, अतिरेकी किंवा आत्यंतिक राष्ट्रवाद धोकादायक ठरतो. दुसरे महायुद्ध होण्यामागे अतिरेकी राष्ट्रवादही एक महत्त्वाचे कारण होते.

आज अमेरिकेतील राष्ट्रवादाची भूमिका प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे आपल्यावर अन्याय होत असल्याच्या भावनेतून निर्माण होत आहे. परदेशी लोक आपल्या देशातील नोकऱ्या घेत आहेत, आपल्या उत्पादित मालाला आवश्यक बाजारपेठ मिळत नाही किंवा इतर देशांकडून जास्त आयात शुल्क लावले जाते, अशी कारणे देऊन जागतिकीकरणावर राष्ट्रवाद हा उपाय म्हणून मांडला जात आहे. याशिवाय राजकीय लोकप्रियता वाढवण्यासाठीही राष्ट्रवादाचा वापर केला जात असल्याचे दिसते.

आपली पारंपरिक संस्कृती आणि विचारधारा सर्वोत्तम आहेत, त्या दोषरहित आहेत आणि त्यांचे जतन केले पाहिजे, असा आग्रह राष्ट्रवादी विचारसरणी करते. देशाचे निर्णय देशातच घेतले जावेत, हा सार्वभौमत्वाचा विचार राष्ट्रवादाचा पाया मानला जातो. परंतु जागतिकीकरणामुळे जागतिक व्यापार संघटना (WTO) किंवा संयुक्त राष्ट्रसंघ यांसारख्या संस्थांच्या नियमांमुळे अनेकदा देशांच्या निर्णयांवर मयार्दा येतात. ही बाब राष्ट्रवादाला मान्य नसते. जागतिकीकरणामुळे जगाची प्रगती होत असली, तरी त्यातून निर्माण होणारी आर्थिक विषमता आणि सांस्कृतिक आव्हाने यांमुळे अनेक देशांमध्ये पुन्हा एकदा प्रखर राष्ट्रवाद वाढताना दिसत आहे. जागतिकीकरणाला सुरुवातीला डाव्या विचारसरणीच्या लोकांनी विरोध केला होता, तर उजव्या विचारसरणीच्या लोकांनी त्याचे स्वागत केले होते. परंतु आज परिस्थिती उलट होताना दिसते. उजवे विचारसरणीचे गट जागतिकीकरणाला विरोध करून राष्ट्रवादाचा पुरस्कार करत आहेत, तर डाव्या विचारसरणीची भूमिका या विषयावर काहीशी गोंधळलेली दिसते.

'प्यू ग्लोबल एटीट्यूडस' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात ४७ देशांतील सुमारे ४५ हजार लोकांच्या मुलाखती या सर्वेक्षणासाठी घेण्यात आल्या. जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आपल्या देशात स्वागत करणाऱ्यांचे प्रमाण चीन आणि भारतात जास्त असल्याचे आढळले. चीनमध्ये ७३ टक्के, तर भारतात ६४ टक्के नागरिक परकीय कंपन्यांना अनुकूल आहेत. आश्चर्य म्हणजे जागतिकीकरणाचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिकेत हे प्रमाण केवळ ४५ टक्के आहे, तर इटलीमध्ये ३८ टक्के आहे. ब्रिटन आणि फ्रान्समध्ये ते याहूनही कमी आहे. यावरून असे दिसते की प्रगत देशांचा जागतिकीकरणातील रस कमी होत चालला आहे.

आज जगात घडणारी युद्धे, हवामान बदलाबाबतची धोरणे, देशांतर्गत राजकारण तसेच आंतरराष्ट्रीय राजकारण या सर्वांमध्ये जागतिकीकरण आणि राष्ट्रवाद यांचा परस्पर संबंध दिसून येतो. जागतिकीकरणाचे फायदे घेतलेल्या भारतासारख्या देशाने जर जागतिकीकरणाकडून राष्ट्रवादाकडे अतिशय तीव्रपणे वळण घेतले, तर तो प्रवास आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या तोट्याचा ठरू शकतो.



– किशोर जाधव,सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# बुद्ध तत्त्वज्ञान आणि मूल्यांचा उद्योग, व्यवस्थापनात उपयोग करा – डॉ. प्रशांत पानसरे

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):–** गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान, संतुलित विचार आणि जबाबदार कृती या मूल्यांचा उद्योग आणि व्यवस्थापन क्षेत्रासाठी उपयोग केल्यास उत्तम व्यवसाय स्थापित करता येऊ शकतो. जग जागतिक परिवर्तनाच्या टप्प्यातून जात असून भूराजकीय पुनर्रचना घडत आहेत. जसे की चीनने पुरवठा साखळी व्यवस्थापनात मोठी प्रगती केली असली तरी भारतासारख्या विकसनशील देशांसाठी उत्पादन क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होत आहेत असे प्रतिपादन उद्योगतज्ज्ञ डॉ. प्रशांत पानसरे यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) येथे "इन्स्पायर २०२६ शाश्वत पद्धती, नवोपक्रम आणि जबाबदार उद्योजकता" या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती.

यावेळी बातांगा विद्यापीठ फिलिपाईन्स डॉ. पॅस्टर आर्गुएल्स, एसआयआयटी थम्मसात विद्यापीठ थायलंड डॉ. थनवडी चिंडा, वर्कस्टर विद्यापीठ युके डॉ. पाओलो मोरा–अव्हीला, राजाभट्ट युनिव्हर्सिटी थायलंड डॉ. अरुण चेनीत, एसबीपीआयएम संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक विभागप्रमुख डॉ. रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

डॉ. प्रशांत पानसरे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य हे देशातील डेटा सेंटर कॅपिटल म्हणून वेगाने विकसित होत आहे, ज्यामुळे डिजिटल अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे. वाढती लोकसंख्या, गरिब रेषेखालील लोकांचे वाढते उत्पन्न आणि तरुणांची वाढती संख्या यामुळे भारत जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा घटक बनत आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात चिप डिझाईन, संशोधन आणि तंत्रज्ञान विकास यामध्ये भारताने पुढाकार घ्यावा, तर उत्पादन प्रक्रियेतील काही भाग जागतिक स्तरावर आउट सोर्सिंगद्वारे विकसित होऊ शकतो. तसेच डिजिटल इनोव्हेशन, डेटा ॲनालिटिक्स आणि डिमांड फोरकास्टिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे उद्योगक्षेत्रात नव्या संधी निर्माण होत आहेत असे उद्योगतज्ज्ञ डॉ. प्रशांत पानसरे म्हणाले.

या परिषदेसाठी एकूण ५३८ सहभागींनी नोंदणी केली आणि २४० संशोधनपर लेख सादर केले. भारत, अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, फिलिपिन्स, थायलंड, लेबनॉन आणि दुबई या देशांतील संशोधकांचा यात समावेश होता. या परिषदेस वॉर्सेस्टर युनिव्हर्सिटी ऑफ युनायटेड किंग्डम, वॉर्सेस्टर बिझनेस स्कूल यांचे सहकार्य मिळाले होते. जर्नल प्रेस ऑफ इंडिया ही संस्था प्रकाशन भागीदार होती. यावेळी तीन जागतिक विद्यापीठांसोबत संशोधन करार करण्यात आला.

या परिषदेत पॅनालिस्ट राजाभट्ट युनिव्हर्सिटी थायलंड डॉ. अरुण चेनीत, वर्कस्टर विद्यापीठ युके डॉ. पाओलो मोरा–अव्हीला, सायबर इलेक्ट्रॉनिक वारफेअर आर्मी वॉर कॉलेज कर्नल डॉ. वीरेंद्र मिश्रा, स्किलव्हेर्ज सीईओ जय ढोलकिया, सेल्स मार्केटिंग प्रमुख थंबूराज अंथुवन, एसबीपीआयएम समन्वयक प्रा. भूषण परदेशी यांनी सहभागीं सोबत व्यवस्थापन, शाश्वत विकास, जबाबदार व्यवसाय नवोन्मेष आणि डिजिटल परिवर्तन यांसारख्या विषयांवर चर्चा केली.

डॉ. दिलीप पवार, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. संतोष शिंदे यांनी नियोजन केले.

सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन आणि डॉ. योगेंद्र देवकर यांनी आभार मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली ही आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली.

# आचेगावच्या कुस्ती मैदानात दोन मिनिटात सिकंदर शेखनं जिंकली दोन लाखाची कुस्ती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगाव येथील १९६७ सालचे हिंदकेसरी पैलवान हजरत पटेल यांच्या स्मरणार्थ निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले होते. या मैदानामध्ये महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध हरियाणाचा पैलवान अजय बनवाला यांच्यामध्ये दोन लाख रुपये इनामाची कुस्ती उद्योजक प्रमोद मोरे यांच्या हस्ते लावण्यात आली होती. सदरची कुस्ती महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख याने दोन मिनिटातच निकाल डावावरती जिंकत दोन लाखाचा इनाम मिळविला.



**उद्योजक मोरे देणार नवीन आखाडा बांधून**

आचेगावच्या मैदानामध्ये राज्यातून नाहीतर परराज्यातूनही पैलवान कुस्तीसाठी येतात. त्यामुळे या गावाला कुस्ती स्पर्धा भरवण्याकरिता आखाडा लहान पडत आहे. सदरची गरज ओळखून उद्योजक प्रमोद मोरे यांनी पुढच्या वर्षीच्या कुस्ती स्पर्धेकरिता मोठा आखाडा बांधून देण्याचे अभिवचन दिले आहे.

तर नेपाळ येथील पैलवान देवा थापा विरुद्ध जसप्रोन सिंग (पंजाब) यांची कुस्ती लावण्यात आली होती. सदरची कुस्ती ही मनोरंजनात्मक होत या कुस्तीमध्ये धोबीपछाड या डावावरती देवा थापाने विजय मिळवत दीड लाख रुपयांचा इनाम मिळविला.

या कुस्ती स्पर्धेमध्ये दीड लाख एक लाख इनामाच्या कुस्त्या लावण्यात आल्या होत्या. यामध्ये पै. सिकंदर मुजावर पै.नबीलाल दिवाने पै. सजेर्राव काळे, पै. संतोष मोची, पै. शाहरुख खान, पै. विजय वारा पैलवान जीवन भुजबळ, पै. मशीद शेख यांच्यासह अनेक छोट्या–मोठ्या पैलवानांच्या कुस्त्या लावण्यात आल्या होत्या व त्यांना रोख स्वरूपात बक्षीस देण्यात आले अशी माहिती कुस्त्यांचे संयोजक उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उपजिल्हाप्रमुख पैलवान प्रताप चव्हाण यांनी दिली.

या कुस्तीच्या फडामध्ये पैलवान रमेश क्षीरसागर ,बोला पटेल, खुशीने जवळघे ,लारा बळुरे, आंबा काळे, श्रीशैल उपाध्ये, सिकंदर पटेल, कुशोउद्दीन देवफोडे, मल्लू खोबर यासीन बिराजदार विठ्ठल बाळगे आदींनी पंच म्हणून काम पाहिले. सदर कुस्ती स्पधेर्चे आयोजन पै. हुसेन पटेल, हसन पटेल, सुरेश मोची, मैनोदीन भागानगरे, इलियास बिराजदार यांनी केले होते .या कुस्ती स्पर्धा मध्ये शंभर रुपयांपासून ते वीस हजार रुपयापर्यंत कुस्त्या नेमण्यात आल्या होत्या.

या कुस्ती स्पधेर्चा शुभारंभ अक्कलकोटचे नगराध्यक्ष मिलन कल्याण शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महेश धाराशिवकर, चंद्रकांत रेम्बोसु, दत्ता माने, संतोष केंगनाळकर, संतोष बडवे, अप्पू गोटे, नाना कळसकर, जर्गिस मुल्ला, आदी मान्यवर उपस्थित होते. यांनी दिली देणगी

आचेगाव येथील कुस्ती मैदानाकरिता उद्योजक दत्तां अण्णा सुरवसे, मनोरमा परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे, यांनी आर्थिक मदत केली होती.

# शिक्षण शुल्क माफीच्या निर्णयामुळे उच्च शिक्षणातील प्रवेशात मुलींची लक्षणीय वाढ – मंत्री चंद्रकांत पाटील



**मुंबई(कटूसत्य वृत्त):–** राज्यातील महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासनाकडून विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. उच्च व तंत्र शिक्षणासाठी मुलींचे शिक्षण शुल्क माफ केल्यामुळे सकारात्मक बदल घडून येत असून मुलींच्या प्रवेशात लक्षणीय वाढ होत आहे असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी सांगितले. उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे २०२३–२४ आणि २०२४–२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कारांचा वितरण समारंभ एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या सर सिताराम तथा लेडी शांताबाई पारकर दीक्षान्त सभागृहात पार पडला. कार्यक्रमात शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कार्यकर्त्यांना गौरविण्यात आले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, संचालक (उच्च शिक्षण) डॉ. शैलेश देवळाणकर, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्ज्वला चक्रदेव, कुलसचिव डॉ. विलास नांदेडकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे उपस्थित होते. राज्यातील नागपूर, अमरावती, उत्तर महाराष्ट्र, कोकण आदी विभागांतून प्रत्येकी एक अशा एकूण १२ पुरस्कारांचे वितरण यावेळी करण्यात आले. या पुरस्काराची रक्कम एक लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती देत, पुढील काळात ही रक्कम टप्प्याटप्प्याने वाढविण्याचा शासनाचा मानस असल्याचे मंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले

मंत्री पाटील म्हणाले की, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क दोन वर्षांपासून पूर्णपणे माफ करण्यात येत आहे. यापूर्वी वार्षिक आठ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील मुलींसाठी ५० टक्के शुल्क शासन देत होते. मात्र, आता ती १०० टक्के करण्यात आली आहे. या निर्णयामुळे पहिल्या वर्षी सुमारे २८ हजार आणि यावर्षी तब्बल ५७ हजार मुलींनी व्यावसायिक शिक्षणात प्रवेश घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

मंत्री पाटील म्हणाले, विद्यार्थिनींच्या राहणीमानाचा खर्च भागविण्यासाठी 'निर्वाह भत्ता' योजना सुरू करण्यात आली आहे. मुंबईसारख्या महानगरात दरमहा सहा हजार, कोल्हापूरसारख्या शहरांत ५,१०० रुपये आणि तालुकास्तरावर २,८०० रुपये याप्रमाणे भत्ता दिला जात आहे. यामुळे वसतिगृह उपलब्ध नसल्यास विद्यार्थिनींना राहण्याची व जेवणाची सोय करणे सुलभ होत आहे.

पुण्यातील लवचिक वेळापत्रकाच्या रोजगार मॉडेलचा उल्लेख करतांना, १२ ते ५ या वेळेत अर्धवेळ नोकरी आणि १० हजार रुपयांपर्यंत मानधन देणारे प्रयोग महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांचा अधिक व्यापक स्तरावर विस्तार करण्याची गरज असल्याचेही मंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले. पुरस्काराची रक्कम महत्त्वाची असली तरी त्यामागील सामाजिक मान्यता अधिक मोलाची असते हा पुरस्कार नियमितपणे व वाढत्या रकमेने देण्याचा प्रयत्न राहील, असे सांगून मंत्री पाटील यांनी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले.

# महिला सक्षमीकरण आणि लिंग-संवेदनशील शहरी प्रशासन विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार ((Ministry of Housing and Urban Affairs – MoHUA, Government of India) यांच्या पूर्ण सहकार्याने ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट (AIILSG), मुंबई अंतर्गत रीजनल सेंटर फॉर अर्बन अँड एन्व्हायर्नमेंटल स्टडीज (RCUES) यांच्या वतीने व सोलापूर महानगरपालिका महिला बालकल्याण विभाग यांच्या सहकार्याने महिला सक्षमीकरण, लिंग–संवेदनशील शासन (Gender Responsive Governance) आणि शाश्वत विकासाच्या संदर्भातील प्रादेशिक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रशिक्षण कार्यक्रम हॉटेल निसर्ग रामलाल चौक सोलापूर येथे सकाळी 9.30 ते सायंकाळी 5 पर्यंत आयोजित करण्यात आला होता..

या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती सौ. रंजिता चाकोते, नवनिर्वाचित सर्व महिला नगरसेविका, सहाय्यक आयुक्त मनिषा मगर, RCUES, AIILSG चे संचालक डॉ. अजित साळवी तसेच RCUES, AIILSG च्या कनिष्ठ संशोधन अधिकारी कु. यशश्री डी. राणे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. अजित साळवी यांनी उद्घाटनपर भाषण करताना शहरी प्रशासनामध्ये महिलांचा सहभाग आणि नेतृत्व वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लिंग–संवेदनशील दृष्टीकोनातून नियोजन आणि अंमलबजावणी केल्यास शहरी विकास अधिक समावेशक आणि परिणामकारक होऊ शकतो असे सांगितले.

यानंतर उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर यांनी प्रमुख भाषण (Keynfote Address) देताना महिलांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरण हे शाश्वत शहरी विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. महिलांसाठी सुरक्षित, समावेशक आणि सशक्त शहर निर्माण करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी लिंग–संवेदनशील धोरणे आणि कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.



तसेच स्थायी समिती सभापती सौ. रंजिता चाकोते यांनी विशेष मार्गदर्शन (Special Address) करताना स्थानिक प्रशासनामध्ये महिलांची भूमिका अधिक प्रभावी करण्यासाठी प्रशिक्षण, क्षमता विकास आणि सामुदायिक सहभाग यांचे महत्त्व स्पष्ट केले.

प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये लिंग–संवेदनशील शासन (Gender Responsive Governance), जेंडर बजेटिंग (Gender Budgeting), महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वयं–सहाय्यता गटांची (Self Help Groups – SHGs) भूमिका, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला प्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी या विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात विविध ग्रुप ॲक्टिव्हिटी घेण्यात आल्या...

तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्थानिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे महत्त्व, समुदायाचा सहभाग, आणि महिलांच्या नेतृत्वातून शहरांच्या विकास प्रक्रियेला गती देण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सोलापूर तसेच परिसरातील महानगरपालिका अधिकारी, नवनिर्वाचित सर्व महिला नगरसेविका, स्वयंसेवी संस्था, स्वयं–सहाय्यता गटांचे प्रतिनिधी आणि विविध विभागांतील अधिकारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाद्वारे सहभागींस शहरी प्रशासनामध्ये महिलांची भूमिका अधिक प्रभावी करण्यासाठी मार्गदर्शन मिळाले. प्रशिक्षणार्थी महिला नगरसेविका व अधिकाऱ्यांना AILSG कडून प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात आले.

SDGS प्रशिक्षण घेतलेल्या महिला नगरसेविका व लोकप्रतिनिधी पुढीलप्रमाणे.. आरती वाकस,वनिता पाटील, अश्विनी चव्हाण, सुमन चाबुकस्वार, वैशाली भोपाळे, संगीता जाधव वहिदा बानो शेख,रोहिणी तडवळकर,श्रीकांचना यन्नम ,राजश्री दोडमणी, कविता गज्जम ,कलावती गाडगे , संगीता जाधव,मंजिरी किल्लेदार, गीता गवई ,बबिता धुम्मा , पूजा वाडेकर,उज्वला दासरी, दीपिका यलदंडी , सारिका काजूरगे ,स्वाती बडगु ,वंदना गायकवाड, ऐश्वर्या साखरे, अलका भवर,मंदाकिनी तोडकरी, सोनाली गायकवाड मृण्मयी गवळी , श्रद्धा पवार , पूनम काशीद, अर्चना वडनाळ, सुनीता कामाठी, अकिला भागनगरी, श्रीदेवी फुलार, विजया खरात, श्वेता खरात ( खांडेकर),कल्पना कदम, निर्मला जंगम इत्यादी. कार्यक्रमाचे समन्वयन RCUES, AIILSG च्या कनिष्ठ संशोधन अधिकारी कु. यशश्री राणे व महिला बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागींचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## वात्रटिका

### हव्यास की हट्ट

हादरून गेले जग सारे
सगळीकडे मनमानी...
बॉम्ब गोळे,स्ट्राईक कुठे
कुठे कुरघोडी, कुठे बेईमानी...
अशांतता पसरली आणि
क्रूरतेचा कळस गाठला...
हव्यास म्हणा अगर हट्ट
माणूस काही करत सुटला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नागरिकांनी ग्राहक हक्क कायद्याविषयी नेहमी जागरूक राहावे: अप्पर जिल्हाधिकारी निऱ्हाळी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** देशभरात 15 मार्च हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. ग्राहक हा कोणत्याही अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. ग्राहकांचे हक्क सुरक्षित राहिले तरच समाजात न्याय, पारदर्शकता आणि विश्वास टिकून राहील. आजच्या डिजिटल युगात ग्राहकांना माहिती मिळविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध झाले आहेत, परंतु त्याचबरोबर फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. त्यामुळे ग्राहकांनी आपले हक्क व ग्राहक कायद्याविषयी जागरूक रहावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले.

जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले, त्याप्रसंगी ते अध्यक्ष स्थानावर मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, सहा. जिल्हा पुरवठा अधकिारी नलिेश देठे, जल्हिा ग्राहक संरक्षण परषिदेचे शासकीय व अशासकीय सदस्य राजेंद्र घाडगे, नंदकुमार देशपांडे, शशकिांत हरदिास, करणि भांगे, स्वप्नलि वाघमारे, यशवंत फडतरे, तानाजी गुंड विविध शासकीय विभागाचे अधिकारी, वद्यिार्थी आदि उपस्थित होते.

ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा भारती सोलवंडे यांनी ग्राहक हक्क कायद्याविषयी माहिती दलिी. तसेच वस्तुची गुणवत्ता व दर्जा याकडे ग्राहकांनी लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी प्रास्ताविकात केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यासाठी Safe Products, Confident Consumer संकल्पना निश्चित केली असल्याची माहिती दिली. तसेच ग्राहक हक्क कायद्याने ग्राहकांना दिलेल्या हक्काची माहिती ही त्यांनी यावेळी सविस्तरपणे दिली. सध्याचे डिजिटल युगात ऑनलाईन खरेदी ही ग्राहकाकडून मोठ्या प्रमाणावर केली जात आहे तसेच या ठिकाणीही ग्राहकांची फसवणूक होऊ शकते तरी ऑनलाईन खरेदी विषयी ग्राहकांनी जागरूक राहिले राहण्याचे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जल्हिा ग्राहक संरक्षण परषिद सदस्य राजन घाडगे यांनी केले. यावेळी रमेश खाडे यांनी महाराष्ट्र गीत सादर करुन ग्राहक प्रबोधनपर पोवाडा सादर केला.

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर, वैद्यमापनशास्त्र यंत्रणा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सोलापूर, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, परिवहन विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग विक्रीकर विभाग आदी विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आलेले होते.

# ग्राहक म्हणून नेहमी जागरुक रहा : तहसीलदार सचिन लंगुटे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. ग्राहकांना वस्तू निवडणे, त्याची गुणवत्ता आणि दर्जा यांचे प्रमाण जाणून घेण्याचा, माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. अनेकदा वस्तू खरेदी करताना ग्राहक बऱ्याच गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि याचाच गैरफायदा विक्रेते घेतात. त्यामुळे ग्राहकाने नेहमी जागरूक राहावे असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले.

तहसील कार्यालय पंढरपूर येथे 15 मार्च हा जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, पुरवठा निरीक्षक विजय बादल, पुरवठा सहा. उमेश हिंगमिरे, नेताजी ओव्हाळ, ग्राहक पंचायतीचे सह सचिव आझाद आल्लापूरकर, मंडळ अधिकारी, नागरिक तसेच कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार श्री. लंगुटे म्हणाले, दरवर्षी 15 मार्च रोजी साजरा होणारा जागतिक ग्राहक हक्क दिन हा दिवस ग्राहकांच्या अधिकारांविषयी जागृती वाढविण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. ग्राहकांना सुरक्षित दर्जेदार आणि पारदर्शक सेवा मिळाव्यात तसेच त्यांच्या तक्रारींना न्याय मिळावा यासाठी शासन विविध उपक्रम राबवत आहे. ग्राहकांना बाजारपेठेत खरेदी करताना अनेकदा चुकीची माहिती निकृष्ट दर्जाचे उत्पादने किंवा फसवणुकीला सामोरे जावे लागते. यासाठी ग्राहकांनी कोणतीही वस्तू घेताना पक्की पावती घेणे आवश्यक आहे. घेतलेल्या वस्तूमध्ये काही कारणास्तव खराबी किंवा त्याच्या सेवेमध्ये त्रुटी आल्यास त्या पावतीचा महत्त्वाचा उपयोग आपल्याला ग्राहक तक्रारीमध्ये करता येतो. आपण घेतलेल्या वस्तूंमध्ये काही त्रुटी आढळल्यास ग्राहक कायद्याअंतर्गत आपण जिल्हा ग्राहक न्यायालयात दाद मागू शकतो तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत यासारख्या विविध संघटनांची मदत घेऊन आपण या तक्रारींची निरसरण करू शकतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी ग्राहक पंचायतीचे सह सचिव अल्लापुरकर यांनी ग्राहक कायदा विषयक माहिती सांगून ग्राहक न्यायालयांमध्ये कशाप्रकारे तक्रारी मांडू शकतो आणि सार्वजनिक तक्रारी असतील तर त्या सीसीपीए या ग्राहक समितीकडे आपण कशा पद्धतीने मांडू शकतो याच्याबद्दल मार्गदर्शन केले. तालुक्यातील नागरिकांना काही अडचणी आल्यास अखिल भारतीय ग्राहक पंचायत पंढरपूर तालुका यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन करून आपले प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरवठा निरीक्षक विजय बादल यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरवठा सहाय्यक उमेश हिंगमिरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार पुरवठा सहाय्यक नेताजी ओव्हाळ यांनी केले .

# सिंहगडच्या मेकॅनिकल विभागात महिला दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये 'जागतिक महिला दिन' निमित्त विविध उपक्रमांसह कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग आणि 'मेसा'(MESA) कमिटीच्या लेडीज रिप्रेझेंटेटिव्हज (LR) तृप्ती विजय पाटील व सिद्धी शिवाजी कुरुंद यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. वनिता सावंत उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नावले होते. तसेच उपप्राचार्य तथा मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. आर. टी. व्यवहारे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या मुख्य वक्त्या डॉ. वनिता सावंत यांनी 'स्त्री सक्षमीकरण' या विषयावर उपस्थित ५० हून अधिक विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. आधुनिक काळात महिलांचे नेतृत्व, त्यांची सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका आणि योगदान किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी आपल्या प्रभावी भाषणातून स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी तृप्ती पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर सिद्धी कुरुंद यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. शंकर नावले यांनी मनोगतातून विद्यार्थिनींना शिक्षणासोबत आत्मविश्वास वाढवण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती पाटील व सिद्धी कुरुंद यांनी केले, तर आभार प्रदर्शन वसुधा भोसले यांनी मानले.

मेकॅनिकल विभागातील विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केली नाल्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज आंवती नगर, गणेशनगर परिसरास भेट देऊन सुरू असलेल्या नाल्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. अवंती नगर ते गणेशनगर या दरम्यान नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरु असून या कामाची आयुक्तांनी सविस्तर आढावा घेतला.यावेळी आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना काम नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देत नागरिकांना पावसाळ्यात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कामात कोणतीही ढिलाई न ठेवण्याचे निर्देश दिले. तसेच नाल्याची क्षमता वाढवून पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने काम प्रभावीपणे राबविण्याचेही त्यांनी सांगितले.या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकूलवार, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, श्याम कन्न यांच्यासह संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ईच्छा भगवंताची परिवाराकडून नूतन राज्यसभा खासदार प्रा डॉ ज्योतीताई वाघमारे यांचा सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील सर्वसामान्य झोपडपट्टी परिसरातील एका सामान्य कुटुंबातून आलेल्या लेकीने आज थेट दिल्लीतील संसदेत झेप घेत सोलापूरचा आवाज बुलंद केला आहे. राज्यसभेच्या खासदारपदी प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने त्यांचा अत्यंत उत्साही वातावरणात रेल्वे लाईन येथील किसन जाधव यांच्या संपर्क कार्यालय येथे सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या वेळी सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव यांनी ज्योतीताई वाघमारे यांना खासदार ताई नमूद असलेले मानाचा निळा फेटा, शाल, भारताच्या संविधानाचे पुस्तक तसेच मोची समाजाचे आराध्य दैवत आदी जांबमुनी महाराजांची प्रतिमा देऊन भव्य हार घालून सन्मानित केले. यावेळी त्यांचे स्वागत हलग्यांच्या कडकडाटात व फटाक्यांच्या आतषबाजीत करण्यात आले. संघर्षमय जीवनप्रवासातून आमच्या भगिनी 'भीम कन्या' म्हणून उभ्या राहिलेल्या ज्योतीताईंची राज्यसभेवर झालेली निवड ही सोलापूरसाठी अभिमानाची व प्रेरणादायी घटना ठरली आहे.

सर्वसामान्य झोपडपट्टी परिसरात वास्तव्य होती ही लेक आता संसदेत सोलापूरचा आवाज ठरणार आहे, असे भावनिक उद्गार व्यक्त करत किसन जाधव यांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी त्या नक्कीच प्राधान्य देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गल्लीतील मुलगी आज दिल्लीत पोहोचली आहे सोलापूरच्या प्रत्येक नागरिकाच्या वेदना व प्रश्नांची मला जाणीव आहे. सर्वांना सोबत घेऊन विकासासाठी अहोरात्र काम करणार,' अशी भावनिक ग्वाही खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी दिली तसेच ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक लक्ष्मण मामा जाधव यांच्या सामाजिक कार्याचे त्यांनी कौतुक केले. या प्रसंगी नगरसेवक प्रियदर्शन साठे, शिवसेना नेते मनीष काळजे, नगरसेवक दत्तात्रय नडगिरी, नगरसेविका सौ.चैत्राली ताई शिवराज गायकवाड, नगरसेविका सौ. कल्पना संतोष कदम, सौ. लक्ष्मी नडगिरी, ओम साई प्रतिष्ठानचे शिवराज गायकवाड, कुमार जंगडेकर, हनुमंत सायबळु, संतोष कदम, श्रीराम जन्मोत्सव समितीचे सुधीर बहिरवाडे, अर्जुन साळवे, सचिन जाधव, निलेश कांबळे, सचिन गुत्तेदार, हरीश तेलगू, व्यंकटेश जाधव (दुर्गा), धनराज संधोळकर, प्रथमेश गायकवाड,तेजस गायकवाड,अजिंक्य जाधव,करण जाधव, कार्तिक जाधव, श्रीकांत गिडे, संतोष ऋतिक गायकवाड, राम पल्ली मिस्त्री, महादेव राठोड, माणिक कांबळे, वसंत कांबळे, फिरोज पठाण, यल्लाप्पा शिवापूरकर, हनुमंत माडेकर, युवराज जाधव, संजय भंडगे,सोनू तळभंडारे यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळा-महाविद्यालयांत 'शाळा, कॉलेज तिथे नाटक' उपक्रम राबविणार




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांमध्ये नाट्यकलेबद्दल आवड निर्माण व्हावी, त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा तसेच त्यांच्यात दडलेले अभिनय गुण विकसित व्हावेत या उद्देशाने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई शाखा अकलूज यांच्या वतीने ह्यशाळा-कॉलेज तिथे नाटकह्ल हा विशेष सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयांच्या प्रांगणात जाऊन विद्यार्थ्यांसाठी थेट नाट्य सादरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती अकलूज शाखेचे प्रमुख कार्यवाह डॉ. विश्वनाथ आवड यांनी दिली.

डॉ.आवड म्हणाले, नाट्य परिषदेचे अध्यक्ष खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नाटक ही केवळ मनोरंजनाची कला नसून ती समाजाचे प्रतिबिंब दाखवणारी आणि जीवनातील विविध पैलूंना स्पर्श करणारी प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात नाट्यकलेचे महत्त्वपूर्ण योगदान असते. अभिनय, संवादकौशल्य, आत्मविश्वास, टीमवर्क आणि सर्जनशीलता वाढविण्यासाठी नाटक हा अत्यंत प्रभावी मार्ग मानला जातो. याच उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत शाळा किंवा महाविद्यालयाच्या प्रांगणात सुमारे एक तासाचे नाट्य सादरीकरण केले जाणार असून यामध्ये सामाजिक आशय असलेली तसेच विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी नाट्यकृती सादर करण्यात येईल. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी संबंधित शैक्षणिक संस्थांकडून कोणतेही मानधन घेतले जाणार नाही. सादरीकरणासाठी येणारे कलाकार हे नाट्य परिषदेचे अनुभवी कलाकार असतील.

शाळा व महाविद्यालयांनी आपल्या सोयीप्रमाणे कार्यक्रमाची वेळ व दिनांक निश्चित करून कळवावा. हा उपक्रम २० मार्च ते ३० मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून कार्यक्रम आयोजित करण्यासाठी इच्छुक संस्थांनी १९ मार्चपर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

सदर कार्यक्रम स्टेज, सभागृह, हॉल किंवा वर्गखोलीत देखील सहज आयोजित करता येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नाट्यप्रयोग पाहण्याची संधी मिळणार असून त्यांच्या कलागुणांना प्रेरणा मिळेल. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शाळा व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी 9422028838, 77760 62402, 84838 15394, 80550 41260, 9503773073 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही नाट्य परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवशंकर बझारचा दुहेरी सन्मान

## HUL व कारगिलकडून राष्ट्रीय पातळीवर गौरव



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील शिवशंकर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था संचलित शिवशंकर बझारने २०२५ या वर्षात उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत राष्ट्रीय स्तरावर दुहेरी मानाचा सन्मान पटकावला आहे. हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड आणि कारगिल फूड सोल्युशन्स साऊथ एशिया या नामांकित कंपन्यांकडून संस्थेचा गौरव करण्यात आला. हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेडकडून उत्कृष्ट भागीदारी आणि उल्लेखनीय सहकार्याबद्दल संस्थेला 'कौतुक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पश्चिम विभागाच्या महाव्यवस्थापक नीरजा चौधरी यांनी ल्वछच्या वतीने हा पुरस्कार देऊन संस्थेच्या कार्याची दखल घेतली.

याबरोबरच कारगिल फूड सोल्युशन्स साऊथ एशियाकडूनही शिवशंकर बझारला मोठा सन्मान मिळाला. वरिष्ठ संचालक (B2C फूड सर्व्हिसेस ॲन्ड बेकरी) शैलेश खुराणा आणि संचालक (NSM B2C) कुंदन कुमार मिश्रा यांच्या हस्ते 'सुपरस्टार्स' स्टार रिटेल आऊटलेट प्रमाणपत्र देण्यात आले. भारतातील टॉप १००० स्टार रिटेल आऊटलेट्समध्ये स्थान मिळवत कारगिलच्या वाढीत मोलाचे योगदान दिल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला. संस्थेच्या चेअरमन डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांनी हा सन्मान स्वीकारला.

संस्थेचे संस्थापक स्व. उदयसिंह मोहिते पाटील यांनी घालून दिलेल्या ध्येय धोरणानुसार आणि शिवरत्न उद्योग समूहाचे चेअरमन कीर्तिध्वज सिंह मोहिते पाटील व अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू असून या यशाबद्दल शिवशंकर बझारच्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांनी व्यवस्थापक गोपाळराव देशमुख यांच्यासह व्हाइस चेअरमन मदन भगत, संचालक किसनराव धुमाळ, अर्जुन भगत, सिनाप्पा वाघमोडे, कैलास ताटे, अनिल उघडे, नारायण फुले, यांच्यासह सर्व संचालक, चीफ अकाउंटंट उत्तम गुरूगुळे, चिफ परचेस ऑफिसर सुरेंद्र माने यांच्यासह सर्व कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या दुहेरी सन्मानामुळे अकलूजच्या शिवशंकर बझारचे नाव राष्ट्रीय स्तरावर उजळले असून, स्थानिक सहकार क्षेत्रासाठीही ही अभिमानाची बाब मानली जात आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेकडून ४५.८३ कोटींचे शिलकी अंदाजपत्रक सादर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी ४५ कोटी ८३ लाख रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक सादर केले. प्रशासकीय कार्यकाळातील हे त्यांचे चौथे अंदाजपत्रक असल्याचे सांगण्यात आले.

यशवंतराव चव्हाण सभागृहात सोमवारी झालेल्या बैठकीत २०२५-२६ चे सुधारित आणि २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक मांडण्यात आले. या अंदाजपत्रकानुसार जिल्हा परिषद सेसद्वारे ४५ कोटी ८३ लाख रुपयांची अपेक्षित आवक तर ४५ कोटी ७४ लाख ८ हजार रुपयांचा खर्च गृहीत धरण्यात आला आहे. यामधून ८ लाख ९२ हजार रुपयांची शिल्लक अपेक्षित आहे.

अंदाजपत्रकात विविध विभागांसाठी वाढीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. आरोग्य विभागासाठी ५ कोटी, शिक्षणासाठी ५ कोटी ३३ लाख, महिला व बालकल्याणासाठी ३ कोटी २५ लाख, ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी ३ कोटी ९६ लाख, कृषी विभागासाठी ३ कोटी ८५ लाख, पशुसंवर्धनासाठी ३ कोटी २० लाख, समाजकल्याणासाठी ४ कोटी ७२ लाख तर बांधकाम विभागासाठी सर्वाधिक ८ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रशासनासाठी ५ कोटी २५ लाख आणि ग्रामपंचायत विभागासाठी २ कोटी २५ लाख रुपयांचा निधी प्रस्तावित आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीपूर्वीच प्रशासनाने घाईघाईत अंदाजपत्रक सादर केल्याची चर्चा रंगली आहे.

नव्या सदस्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न असल्याची टीका काही वर्तुळांतून होत आहे.

याबाबत स्पष्टीकरण देताना मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले की, जिल्हा परिषद अधिनियमातील कलम ४५(५) नुसार २७ मार्चपूर्वी अंदाजपत्राक मांडणे आवश्यक होते. अध्यक्ष-उपाध्यक्ष निवड, त्यानंतर सभापती निवड आणि आवश्यक कालावधी लक्षात घेता वेळेत अंदाजपत्रक मांडणे शक्य नसल्याने प्रशासनाकडून ते सादर करण्यात आले. नव्या पदाधिकाऱ्यांना आवश्यक ते बदल करण्याची मुभा राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# पोलिसी खाक्या दाखवताच खुनाच्या गुन्ह्याची कबुली

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** मौजे नातेपुते पर्वतेश्वर माळ ता. माळशिरस येथील विजय डोंग्या भोसले वय ३५ वर्षे यास मेहुणा यया बि-या काळे रा. बारामती ता.जि.पुणे व पत्नी कांती विजय भोसले हीने सुरीने विजय भोसले याचे कानावर मारुन त्यास जखमी केले.व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन विजय डोंग्या भोसले यास जीवे ठार मारले. असल्याची कबुली कांती विजय भोसले हीने नातेपुते पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच दिली असून या खुनातील मुख्य आरोपी यया बि-या काळे हा फरार झाला होता. त्यास नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर व पोलीस कर्मचारी यांनी रहीमतपुर जि. सातारा येथे सापळा रचून त्याचा पाठलाग करून गुन्हा घडले पासून २४ तासाच्या आत पकडून जेरबंद केले.

याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मौजे नातेपुते येथे शनिवार दिनांक १४ मार्च रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास पर्वतेश्वर माळ नातेपुते ता. माळशिरस येथील विजय डोंग्या भोसले वय ३५ वर्षे यास त्याची पत्नी कांती विजय भोसले व मेहुणा यया बि-या काळे रा. बारामती ता. बारामती जि. पुणे यांनी बारामती येथे रहायला चल, असे म्हणुन विजय भोसले याचे सोबत भांडणे करुन यया बि-या काळे याने मयत नामे विजय डोंग्या भोसले याचे डोक्यात दगड घालुन व कांती विजय भोसले हीने सुरीने विजय भोसले याचे कानावर मारुन त्यास जखमी केले. व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन विजय डोंग्या भोसले यास जीवे ठार मारले असता सदर घटनेची माहिती नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांना मिळताच घटनास्थळी पोलीस कर्मचारी घेऊन धाव घेतली व गुन्ह्यातील महीला आरोपी नामे कांती विजय भोसले हीस ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच आरोपी नामे कांती विजय भोसले हिने मी व यया बि-या भोसले याने गुन्हा केल्याची कबुली दिली. मात्र यातील मुख्य फरार आरोपी यया बि-या भोसले हा गुन्हा केल्यानंतर फरार झाला होता. त्यास पकडण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर व नातेपुते पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोना.

राकेश लोहार, पोकॉ. संतोष वारे यांनी आरोपी यया बि-या भोसले याची गोपनिय माहीती काढुन कौशल्यपुर्ण तपास केला असता नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी सपोनि विशाल वायकर व नातेपुते पोलीस ठाणेचे आरोपी शोध पथकातील मपोसई सोनल मोरे, सफौ. सतीश पाटकुलकर, सफौ. देविदास धोत्रे, सफौ. रविंद्र गायकवाड, पोहेकॉ धनाजी शेळके, पोना. राकेश लोहार, पोना. सुरेश एकतपुरे, पोकों. रणजित मदने, पोकों. अस्लम शेख, मपोकों. सीमा सोनवणे, चापोकों/डी. संतोष वारे, चापोकॉ नवनाथ चव्हाण, सायबर शाखेचे पोलीस अंमलदार प्रविण मेटकरी यांनी मुख्य आरोपी यया बि-या काळे यास रहीमतपुर जि. सातारा येथे सापळा रचून पाठलाग करून त्या ठिकाणाहून ताब्यात घेऊन २४ तासाच्या आत नातेपुते पोलीस ठाणे येथे जेरबंद केले असून आरोपी कांती विजय भोसले व मेहुणा यया बि-या काळे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता नियमानुसार नातेपुते पोलीस ठाणे येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून आरोपीस सोमवार दिनांक २० मार्च रोजी माळशिरस येथे न्यायालयीन कोठडीत हजर केले असता.

शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी पर्यंत ४ दिवसाची पोलीस कस्टडी मिळाली आहे. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर , उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके, पोलीस निरिक्षक संजय जगताप स्था.गु. शा. सोलापुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून नातेपुते पोलीस प्रशासनाने केलेल्याकामगिरीबद्दल त्यांचे नातेपुते व परिसरातून कौतुक होत आहे.

## मुख्य आरोपी २४ तासात जेरबंद

